थोडक्यात महत्त्वाचे

गौरव साने यांची कनिष्ठ सहाय्यकपदी निवड

केसरी वृत्तसेवा

वारणानगर : चिपरी (ता.शिरोळ) येथील गौरव सुभाष साने यांची पुणे जिल्हा परिषदेत वित्त विभागात कनिष्ठ सहायक पदी निवड झाली. सध्या तो पुणे येथे राहत आहे. गौरव याने भारती विद्यापीठ पुणे येथे शिक्षण पूर्ण केले आहे. त्यांने पुणे जिल्हा परिषद सरळ सेवा परिक्षेअंतर्गत परीक्षा दिली होती. या निवडीबद्दल वारणा उद्योग समूहाचे अध्यक्ष आमदार डॉ. विनय कोरे, वारणा बझारच्या संचालिका बबू महापुरे, माजी समाजकल्याण सभापती विशांत महापूरे, वारणा दूध संघाचे संचालक शिवाजी जंगम, अमृत सेवक पतसंस्थेचे संचालक राजाराम धोंगडे,अनिल महापुरे यांनी सत्कार केला.

गौरव साने

योगी आदित्यनाथ यांची सभा ऐतिहासिक करण्याचा निर्धार

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ १ मे रोजी महायुतीचे उमेदवार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ जाहीर प्रचार सभा घेण्यास येणार आहे. सभेच्या तयारीसाठी भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर यांनी आढावा बैठक घेतली. बैठकीस भाजपाचे जिल्हा अध्यक्ष राजवर्धन नाईक-निंबाळकर, भाजपचे शहर अध्यक्ष पै.अमृत भोसले, राज्य वस्त्रोउद्योग महासंघाचे अध्यक्ष अशोक स्वामी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष विठ्ठल चोपडे, दलित मित्र अशोकराव माने यांच्यासह महायुती घटक पक्षांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

काँग्रेस पक्षाने काढलेला जाहीरनामा फसवा : सुरेश हाळवणकर

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : काँग्रेस पक्षाने काढलेला जाहीरनामा फसवा आहे. सत्तेत येण्याची शास्वती नसल्याने ते फसवे आश्वासन देत आहेत. असा आरोप भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष सुरेश हाळवणकर यांनी केला ते दुर्गामाता मंदिर परिसरात कॉर्नर सभेत बोलत होते. म्हसोबा मंदिर, गटारी आणि भुई समजा आदी कामांसाठी खासदार धैर्यशील माने यांनी मोठा निधी दिल्याचा उल्लेख अनेक मान्यवरांनी यावेळी आपल्या भाषणात केला. सूत्रसंचालन भाऊसो आवळे यांनी केले. यावेळी हिंदुराव शेळके,राहुल आवारे, रणजीत जाधव, अनिल डाळ्या, रवी गोंदकर, दादा भाटले, रणजीत अनुसे, संतोष पंडित, प्रताप पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते. आभार किसन शिंदे यांनी मानले.

भाजपच्यावतीने प्रचार पत्रकाच्या वाटपाचा शुभारंभ

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे अधिकृत उमेदवार खासदार धैर्यशील माने यांच्या प्रचारार्थ प्रचार पत्रकाच्या वाटपाचा शुभारंभ गुरु कन्नन नगर मठाजवळ भाजपाचे प्रदेश उपाअध्यक्ष सुरेश हाळवणकर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.यावेळी हिंदुराव शेळके शहराध्यक्ष पै.अमृत भोसले, अनिल डाळ्या, तमन्ना कोटगी, रवी लोहार, अतुल शेळके, संतोष शेळके, मोहन कुंभार, उमाकांत दाभोळे, उपाध्यक्ष चिदानंद कोटगी आदी उपस्थित होते.

स्वामी समर्थ केंद्रामध्ये आजपासून गुरूचरित्र पारायण

केसरी वृत्तसेवा

जयसिंगपूर : येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात आज मंगळवार दि. ३० रोजी पासून अखंड नाम, जप, यज्ञ, याग श्री गुरूचरित्र पारायण सप्ताहाला सुरुवात होणार आहे. सोमवारी ग्रामदेवता सन्मान, मंडल मांडणी अग्निप्रदिपन करण्यात आला. आज मंगळवारी मंडल स्थापना, स्थापित देवता हवन नित्यस्वाहाकार व गुरूचरित्र वाचन प्रारंभ होणार आहे. बुधवारी नित्यस्वाहाकार, गणेश याग, गुरूवारी नित्य स्वाहाकार, स्वामी याग, शुक्रवारी नित्य स्वाहाकार व चंडी याग, शनिवारी नित्य स्वाहाकार व गिताई याग, रविवारी नित्य स्वाहाकार, रूद्र याग, मल्हारी याग व सोमवारी नित्य स्वाहाकार, बलि, पुर्णाहुती, श्री सत्यदत्त पुजन असे कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमाचे लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

कोल्हापुरात तलाठ्याचे दुपारी निलंबन, सायंकाळी आदेशपत्र मागे

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : निवडणूक कामाच्या ठिकाणी गैरहजर असल्याच्या कारणावरून एका तलाठ्याचे निलंबन नाट्य रविवारी कोल्हापुरात चांगलेच रंगले. याच कारणातून वळीवडे (ता. करवीर) येथील तलाठ्यास दुपारी निलंबित करण्यात आले आणि सायंकाळी आदेशपत्र मागे घेण्याचा किमयाही घडली. निवडणूक प्रक्रियेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे प्रशासकीय काम असल्याचे सांगून कानावर हात ठेवले.

लोकसभा निवडणुकीची प्रक्रिया प्रशासन पातळीवर गतिमान झाली आहे. या अंतर्गत केंद्रनिहाय मतदान यंत्र तयार करण्याचे आदेश देण्यात आले होते. हे काम व्ही. टी. पाटील भवनात सुरु होते. मतदान यंत्र हा विषय संवेदनशील असल्याने काम ाच्या ठिकाणापासून कोणत्याही अधिकारी, कर्मचाऱ्यास बाजूला जात येत नाही.

वळीवडे येथील तलाठी प्रवीण शेजवळ हे नेमून दिलेले कामकाज पूर्ण होईपर्यंत हजर राहणे आवश्यक असताना होते. पण ते कामाच्या ठिकाणी गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार कोल्हापूर लोकसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, उपविभागीय अधिकारी हरीश धार्मिक यांनी प्रवीण शेजवळ यास निलंबित करणारा आदेश रविवारी दुपारी जारी केला आहे. त्यावर कर्मचारी संघटनांनी आक्रमक भूमिका घेतली. अखेर सायंकाळी याच अधिकाऱ्याने निलंबन मागे घेण्याचा दुसरा आदेश लागू केला.

खासदारांकडून जनतेची दिशाभूल : सत्यजित पाटील

इचलकरंजी : गावभागात झालेल्या प्रचार सभेत बोलताना सत्यजित पाटील.

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : आजी-माजी खासदारांनी गेल्या १० वर्षात केवळ जनतेची दिशाभूल करत स्वार्थाचे राजकारण केल्याने पाणी प्रश्नासह उद्योजक, व्यापारी, कामगार, महिलांचे प्रश्न गहण बनले आहेत.

पाण्यासह सर्वच प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी मला संधी द्यावी, असे आवाहन महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील यांनी केले. येथील गावभागात झालेल्या प्रचार सभेत ते बोलत होते.

सत्यजित पाटील म्हणाले, आजी-माजी खासदार निष्क्रीय ठरल्यानेच जनतेने मला लांबचा असलो तरी स्विकारल्याचे शिरोळपासून शाहुवाडीपर्यंत असलेल्या महाविकास आघाडीच्या झंझावत्या प्रचारातून दिसून येत आहे. गेल्या १० वर्षात स्वार्थ साधण्यापलीकडे जाऊन कधीही जनतेचा विचार केला गेला नाही. सत्ताधाऱ्यांना जनता कंटाळली असून परिवर्तन अटळ आहे. त्यामुळे मला संधी द्यावी असे आवाहन त्यांनी केले.

शशांक बावचकर म्हणाले, स्वार्थाचे, जाती भेदाचे राजकारण सुरु आहे. सत्ताधाऱ्यांकडे विकासाचा एकही मुद्दा नाही. सत्ताधाऱ्यांची मनमानी थांबवण्यासाठी मतदार यांच्याशी गद्दारी करणाऱ्या खासदार धैर्यशील माने यांना जनता नक्कीच घरात बसवेल, असा विश्वास व्यक्त केला.

संजय तेलनाडे यांनी शहराचा पाणी आणि वस्त्रोद्योगासह मुलभूत प्रश्न सोडवण्याची गरज व्यक्त केली आणि सत्यजित पाटील अधिकाधिक मताधिक्य मिळवून देण्याचे आवाहन केले. सभेस मदन कारंडे, सागर चाळके, संजय कांबळे, प्रकाश मोरबाळे, कैश बागवान, राजु आलासे, अब्राहम आवळे उपस्थित होते.

लोकशाही बळकटीकरणासाठी सत्यजित पाटील संसदेत गरज

शशांक बावचकर

केसरी वृत्तसेवा

इचलकरंजी : स्वत:च्या स्वार्थासाठी पक्ष फोडणाऱ्यांना, सत्तेत सहभागी करून घेणाऱ्यांना सत्तेपासून रोखण्यासाठी आणि लोकशाही बळकट करण्यासाठी लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार सत्यजित पाटील यांना मताधिक्यांनी विजयी करण्याचे आवाहन शशांक बावचकर यांनी केले. नेहरूनगर येथे झालेल्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, देशात काँग्रेसची सत्ता असताना जनता समाधानी होती, मात्र २०१४ नंतर देशात निर्माण झालेल्या विदारक स्थितीला जनता कंटाळली आहे. इचलकरंजीचे प्रश्न सोडवण्यासह सर्वांगिण विकासासाठी सत्यजित पाटील यांनाच विजयी करण्याची गरज बावचकर यांनी व्यक्त केली. ८० कोटी जनतेला मोफत धान्य देण्याऐवजी त्यांच्या हाताला काम आणि त्याचा योग्य मोबदला दिला तर जनतेला बाजारातून धान्य विकत घेण्याची परिस्थिती निर्माण होणार नाही, मात्र यामुळे भाजपला सत्ता मिळणार नाही, अशी टीका प्रकाश मोरबाळे आणि उषा कांबळे यांनी केली. यावेळी अब्राहम आवळे यांनी केले. मदन कारंडे, सयाजी चव्हाण, नागेश शेजाळे, अभिजीत रवंदे, सदाशिव माने, अलिशा आवळे यांनी मनोगत व्यक्त केले.

मुख्यमंत्री पदाच्या लालसेपोटी महाराष्ट्र भरडला जातोय

केसरी वृत्तसेवा

जयसिंगपूर : शिंदे व ठाकरे सरकार यांच्यामुळे शेतकऱ्यांचे काय भले झाले आहे. याचाखुलासा दोघांनीही करावा. या दोघांमुळे शेतकऱ्यांचे वाटोळेच झाले आहे. या दोघांची भांडणे ही मुख्यमंत्री पदाच्या लालसेपोटीच आहेत. यांच्या लालसेपोटी सारा महाराष्ट्र भरडला जात आहे, अशी टीका स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केली.

राजू शेट्टी

ते हेरले (ता. हातकणंगले) येथे जाहीर सभेत बोलत होते. राजू शेट्टी म्हणाले, यांना जनतेच्या प्रश्नांपेक्षा स्वतःचा पक्ष महत्वाचा वाटत आहे. या निवडणुका जनतेच्याप्रश्नावरझाल्यापाहिजेत. पवारांची राष्ट्रवादी फुटली. ठाकरेंची शिवसेना फुटली. मग यांच्या भावनेचा कडेलोट झाला. पक्ष फोडणारे आता सत्तेत आहेत. या मतदारसंघात परिवर्तन घडवा, असे आवाहन शेट्टी यांनी केले.

यावेळी मुणेर जमादार, राजेश पाटील, संतोष जाधव, पद्माराणी पाटील, बाळगोंडा पाटील, अमोल पाटील, वैभव कांबळे यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कवठेमहांकाळ येथील म्हसोबा देवाच्या यात्रेस प्रारंभ

आज मुख्य दिवस, बुधवारी महाप्रसाद वाटप

केसरी वृत्तसेवा

घाटनांद्रे : कवठेमहांकाळ शहरातील मध्यवर्ती मसोबागेट येथे असणाऱ्या श्री म्हसोबा देवाच्या यात्रेस प्रारंभ झाला असून सोमवार, दि. २९ रोजी श्रीची बोणी व नैवेद्य पार पडली. आज मंगळवार दि. ३० हा यात्रेचा मुख्य दिवस असुन, यानिमित्ताने सकाळी श्री पूर्जा, अभिषेक यासारखे कार्यक्रम पार पडणार आहेत.

बुधवार दिनांक १ मे रोजी यात्रेनिमित्ताने मंदिर परिसरात सकाळी ११ ते दुपारी ३ यावेळेत महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.याचा लाभ तमाम भाविक भक्तांनी घ्याव असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आले आहे.

यात्रेनिमीताने मंदिर परिसरात भव्य व आकर्षक आसा मंडप उभारण्यात आला असून आकर्षक अशी विद्युत रोषणाईही करण्यात आली आहे. यानिमित्त सोमनाथ लाटवडे, जगन्नाथ शिंदे, विजय भोसले,आण्णासाहेब सुंगारे, भानुदास माने, चंद्रकांत बाबर, संजय बाबर, बाळू कांबळे, रुपेश वाघमारे, धनाजी जाधव, अशोक भाऊजी, नंदकुमार जगताप, शरद कदम, तुकाराम सुतार, सलीम भाई,अजित सुतार, गोमटेश बंधू, भंडारे बंधू, वसंत इंगळे, दता दोडमिशेसह मित्रपरिवार संयोजन करीत आहेत.

सोनाई चँरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित सामुदायिक विवाह सोहळा प्रसंगी डॉ. विश्वजित कदम, महेंद्र लाड, गणपतराव पुदाले, वैभव पुदाले आदी मान्यवर.

सोनाई ट्रस्टच्यावतीने सामुदायिक विवाह सोहळा उत्साहात

केसरी वृत्तसेवा

पलूस : आपण या मातीचे काहीतरी देणे लागतो, या कृतज्ञतेच्या भावनेतून पलुस येथील सोनाई चँरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला.

या सोहळ्यासाठी पलूस व परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. पलुसमध्ये मोफत सामुदायिक विवाह सोहळ्याचे २२ वे वर्ष असल्याने भव्य व आकर्षक सजावट करण्यात आली होती.

स्वागत सोनाई ट्रस्टचे संस्थापक गणपतराव पुदाले, पलूस सहकारी बँकेचे अध्यक्ष वैभव पुदाले, नगरपरिषद माजी गटनेते सुहास पुदाले, पलूस शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाश पुदाले, कार्यवाह जयसिंगराव सुर्यवंशी सहकार्यवाह जयंत कदम, मोहन पुदाले, सर्व सदस्य आदींनी केले.

यावेळी आमदार डॉ. विश्वजित कदम, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्र लाड, 'क्रांती' कारखान्याचे चेअरमन शरद लाड, मानसिंग बँकेचे संस्थापक जे. के. बापू जाधव, किरण लाड, पांडुरंग सूर्यवंशी आदींसह परिसरातील सर्व मान्यवर उपस्थित होते. दुष्काळग्रस्त, गोरगरीब, गरजूंसाठी मदतीचा हात देणाऱ्या, सोनाई चँरिटेबल ट्रस्ट पलुस यांच्यावतीने मोफत सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केला. यामध्ये ८ जोडप्याचे लग्नकार्य मोफत करुन देण्यात आले. प्रत्येक जोडप्यास मंगळसुत्र, मुला-मुलीचे कपडे, संसार उपयोगी भांडी मोफत दिली. दोन्ही बाजूकडील लोकांची जेवणाची सोय केली. सर्वधर्मीय मोफत सामुदायिक विवाह सोहळाचे हे सलग २२ वे वर्ष आहे. या सोहळ्यात मंगळसुत्र, प्रत्येक जोडप्याला संसारपयोगी भांडी, कपडे, असा सर्व खर्च ट्रस्टच्यावतीने मोफत केला. संयोजन अरुण पुदाले, विकास पुदाले, विलास पुदाले, संजय गणेशकर, विलास हजारे, जगन्नाथ पुदाले, मनोहर बुचडे, अजित पुदाले, सुरेश पुदाले, महादेव पुदाले आदींनी केले. सुत्रसंचालन श्रीकांत माने यांनी केले.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: कोल्हापूर

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत. ह्याद्वारे आम्ही आमची लिलावाची सूचना दिनांक 23-04-2024 रोजी कोल्हापूर टाइम्स आणि कोल्हापूर केसरीमध्ये प्रसिध्द केली होती, त्याचे स्मरण देत आहोत.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 27.04.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरंभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. विनायक भोसले 2. शुभांगी भोसले 3. अर्जुन श्यामराव शेलार	वर्णन -I ह्या मालमत्तेचा प्रत्येक आणि सर्व भाग: गाला/फ्लॅट नं.101 ज्याचं चटई क्षेत्रफळ 14.88 चौरस मीटर्स आहे आणि बांधकाम केलेलं क्षेत्रफळ 19.52 चौरस मीटर्स आहे जे 'लकडे चेंबर्स' नावाच्या इमारतीत तळमजल्यावर आहे, ही इमारत सिटी सर्वे नं.1825 वर बांधली असून 160.5 चौरस मीटर्स क्षेत्रफळ आहे व जी 'बी' वॉर्ड, मंगळवार पेठ, नांगीवली चौक, कोल्हापूर येथे आहे. सीमा: पूर्व - गाळा नं.4; पश्चिम - थोरावत ह्यांची मालमत्ता; उत्तर - रस्ता; दक्षिण - रस्ता वर्णन -II ह्या मालमत्तेचा प्रत्येक आणि सर्व भाग: शॉप युनिट नं. एस-4, जे इमारतीच्या उत्तर पूर्व भागात असून तळमल्यावर आहे. ज्याचे चटई क्षेत्रफळ 16.25 चौरस मीटर्स आहे आणि 'लकडे चेंबर्स' ह्या इमारतीचा सुपर बिल्ट अप क्षेत्रफळ 16.42 आहे, ही इमारत सिटी सर्वे नं. 1825 वर बांधली असून तिचे क्षेत्रफळ 160.5 चौरस मीटर्स आहे, जी 'बी' वॉर्ड, मंगळवार पेठ, नानगिवाली चौक, कोल्हापूर येथे आहे. सीमा: पूर्व - रस्ता; पश्चिम - ऑफिस युनिट नं. एस-5; उत्तर - रस्ता; दक्षिण - ऑफिस युनिट नं. एस-3; वरच्या बाजूला - निवासी फॅमिली युनिट नं. 103; खालच्या बाजूला - गोडाउन युनिट नं.1 वर्णन-III ह्या मालमत्तेचा प्रत्येक आणि सर्व भाग: शॉप नं. एस-5 जे इमारतीच्या उत्तर दिशेला आहे, ह्या इमारतीचे चटई क्षेत्रफळ 13.24 चौ.मीटर्स आहे आणि बांधकाम केलेलं क्षेत्रफळ 14.49 चौरस मीटर्स आहे, हे दुकान तळमजल्यावर असून इमारतीचे नाव 'लकडे चेंबर्स' आहे, ही इमारत सिटी सर्वे नं. 1825 वर बांधली असून तिचे क्षेत्रफळ 160.5 चौरस मीटर्स आहे, जी 'बी' वॉर्ड, मंगळवार पेठ, नानगिवाली चौक, कोल्हापूर येथे आहे. सीमा: पूर्व - ऑफिस युनिट नं. एस-4; पश्चिम - गोडाउन युनिट नं.101; उत्तर - रस्ता; दक्षिण - मोकळी जागा, चौक; वरच्या बाजूला - निवासी फॅमिली युनिट नं. 103; खालच्या बाजूला - ऑफिस युनिट नं. एस-1	H0098415 06211110 15	25 मार्च 2024	रु. 3,10,080/-	रु. 4,923,169.99/-	रु. 31,00,800/-	25.05.2024	01.06.2024 रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5:30

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **31/05/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही..
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **01/06/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **03/06/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - अशोक लबाडे, संपर्क क्रमांक 9637764444, ऑफिस: एल&टी फायनान्स लि. - ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
8. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
9. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
11. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 30.04.2024
ठिकाण: कोल्हापूर